(36)

राहता येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर,


यांचे कोर्टात

रे.मु.नं.
७९/२०१३

वादी
भाऊसाहेब भिवाजी त्रिभुवन

**प्रतिवादी**
शामलता मदन त्रिभुवन

**या कामी दाव्यातील प्रतिवादी नंबर ९ व याच दाव्यातील काउंटर क्लेम वादी अशोक अनंत त्रिभुवन विनंती अर्ज की,**




सदर दावा हा २०१३ पासून गेली १० वर्ष प्रलंबित आहे. युक्तिवाद व पुरावे सर्व सादर केलेले आहेत. मा.न्यायालयास विनंती आहे की, काउंटर क्लेम वादींचे वय ७० असून गेले १०० वर्षापासून मौजे अस्तगाव येथील शेतजमीन महार वतन हाडोळा इनाम वर्ग सहा ब ही जमीन तत्कालीन सरकारने १९३० साली ७/१२ उतारा तयार करून व त्यावर कोणाचे हिस्से कोठे हे निश्चित करून इनाम जमिनीचे वाटप झालेली आहे व याचे रेकॉर्ड ३ वेळेस वर्णनयादी सोबत आम्ही मा.न्यायालयात सादर केलेली आहे. सबब विनंती आहे की, अलीकडे मा.सुप्रीम कोर्ट यांनी वृत्तपत्राद्वारे देशातील न्यायालयांना जाहीर केलेले आहे की, दहा वर्षांच्या वर असलेले दावे त्वरित निकाली काढावेत. आम्ही या सर्व गोष्टींचे नम्रतेने मा.न्यायालयाचे निदर्शनास आणु इच्छितो की, सदर दावा हा संपूर्ण खोटा आहे त्यात कागदोपत्री पुरावा नाही, खोटा व अदृश्य गोष्टी न्यायालयात केवळ कथन करून सामनेवालेचे वकील बी.ए.हुसळे हे वेळकाढूपणा करीत आहेत. त्यांचा पक्षकार वादी **भाऊसाहेब शिवाजी त्रिभुवन** हा गेली दहा वर्ष दाव्यामध्ये रोजनाम्यावर हजेरी लावून घेतो, ही व्यक्तीच अस्तित्वात नाही हा ४२० चा प्रकार आहे. तसेच निशाणी क्रमांक ५ वर पान नंबर ७ वर मुद्दा ४ व ओळ नं.२ यात मूळ खातेदार **बाळाजी** या व्यक्तीचे वर्णन जमीन वाटप करून घेण्यासाठी नमूद केले आहे. पण बाळाजीचा खाते उतारा अदयाप

O Plaintiff to file say 29/9/23

Copy Recieved Adv for plaintiff Date- 18/10/23

न्यायालयात पुरावा म्हणून सादर केलेले नाही. ही एक मोठी लबाडी आहे ४२० चा प्रकार आहे. तसेच याच पॅरेग्राफमध्ये सामनेवालेने नमूद केलेले आहे की दिनांक ३०.०७.१९६२ रोजी फेरफार क्रमांक ६१६८ या द्वारे हे महार वतन ब्रिटिश सरकारने दिलेले आहे परंतु हे सर्व धादांत खोटे असून ६१६८ हा फेरफार संबंध नसलेला न्यायालयाची फसवणूक करण्यासाठी व माझी फसवणूक करून माझी जमीन हडप करण्यासाठी हे सर्व चालले आहे कारण हा फेरफार नामे **कारभारी भागुजी जेजुरकर** यांचा आहे. व त्याचा व माझा काहीही संबंध नाही. गेली दहा वर्ष सामनेवालेने या गोष्टीचे उत्तर, स्पष्टीकरण न्यायालयात दिलेले नाही. म्हणून हा दावा आता त्वरित रद्द व्हावा. अशा खोट्या गोष्टींच्या आधारे सामनेवालेने माझे संपूर्ण वडीलोपार्जीत शेतजमीन एकंदर ३ एकर ३० गुंठे यावर अतिक्रमण करून तो पिके घेत आहे व २००१ पासून तो त्यावर उत्पन्न घेत आहे. गट नंबर ३५ व ३९ वरच्या माझ्या दोन विहिरी व ३९ वर घर व १६९ गट नंबर वरचे घर संपूर्णपणे ताब्यात घेतले आहे.

सदर दाव्यातील निशाणी क्रमांक १४५ वर नि. क्रमांक १३६ मा.न्यायालयाने माझ्या बाजूने निकाल दिलेला आहे परंतु सदर वादी हा सध्या कोपरगाव डिस्ट्रिक्ट कोर्टमध्ये अपीलात जाऊन वेळकाढूपणा करीत आहे. याआधी २०१६ मध्ये मा.न्यायाधीश खुलपे साहेब यांनी या दाव्यात कोर्ट कमिशनचा माझा अर्ज मंजूर केला होता. त्यावर सामनेवाले हायकोर्टात जाऊन अडथळा आणण्याचा प्रयत्न केला परंतु माननीय न्यायालयाने व त्यांचे न्यायाधीश नलावडे साहेबांनी माझे बाजूने निकाल देऊन कोर्ट कमिशनची ऑर्डर केली. त्यावर कोर्ट कमीशन झाले व २००१ पासून सामनेवालेने माझ्या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे हे सिद्ध झाले आहे.

सबब, न्यायालयास विनंती आहे की मला न्याय लवकर द्यावा कारण सामनेवालेने माझी वडिलोपार्जित जमीन मौजे अस्तगाव सर्वे नंबर १०/३ याचा नवीन गट नंबर ३५ याचे पूर्वीचे क्षेत्र १ एकर ३ गुंठे होते पण

सध्या ते केवळ ३५ गुंठे दाखवण्यात आलेले आहे व तसे ७/१२ उताऱ्यावर क्षेत्र कमी करून घेतले आहे. कारण या गट नंबर वर माझे वडीलोपार्जित स्वखर्चाने व कष्टाने खोदलेली विहीर आहे. ती हडप करण्यासाठी नो मॅन्स लॅंड दाखवून विहीर हडप करण्याचा सामनेवालेचा इरादा आहे. तो मला मान्य नाही. या गटांमध्ये १९३० साली वाटणी हिस्से पडले आहे. त्यात मी पूर्वेकडून आहे व तिथे ही विहीर आहे. रेकॉर्ड बदलणे जमीन हडप करणे ही कारनामे सामनेवालेचे चालू आहे. या गट नंबरमध्ये वादी व प्रतिवादी यांची आठ आणे जमीन हिस्सा आहे. तसेच गट नं.३९ मध्ये देखील पुर्वेकडे माझी शेतजमीन घर व विहीर आहे व क्षेत्र ५२ गुंठे आहे. तसेच गट नं.१६९ हा देखील पुर्ण माझ्या मालकीचा वडीलोपार्जीत असलेला गट आहे.

**प्रार्थना** - दाव्याचा निकाल लवकरात लवकर लावावा. माझ्या वयाचा विचार करून व माझ्या शेताचे झालेले नुकसान व त्याचे भरपाई कॉम्पिनसेटरी कॉस्ट सी.पी.सी. कलम ३५ A द्वारे मला संपूर्ण २३ वर्षाचे मागील शेतजमीन उत्पन्नाची भरपाई मिळावी ही विनंती. तसेच गट नंबर ३५ वरचे क्षेत्र दुरुस्तीच्या आदेश मा.न्यायालयाने राहता प्रांत यांना दयावेत ही विनंती तसेच माझ्या जमीनीवर माझे नाव लावण्यासाठी प्रांत साहेब राहता यांना आदेश दयावेत.

**सोबत** - सर्वे नंबर १०/३ चा गट नंबर ३५ जुना सर्वे नंबर ७/१२ वर १ एकर ३ गुंठे आहे व नवीन गट नंबर वर केवळ ३५ गुंठे दाखवले व कोणतेही कारण त्यात नमूद केलेले नाही मुद्दाम क्षेत्र कमी केलेले आहे. मा.न्यायालयाच्या माहितीसाठी सोबत देत आहे.

ता.२९/०९/२०२३

राहाता

सामनेवाले नं.९

अशोक अनंत त्रिभुवन

वादी तर्फे म्हणणे

सदरचा अर्ज विना अधिकार क्षेत्र असून प्र. वादी ९ हा अनेक वेळेस सातत्याने अशा स्वरुपाचे बेकायदेशीर अर्ज दाखल करुन कोर्ट प्रक्रियेचा गैरवापर करीत आहे. यापूर्वी प्र. वादी ९ ने नि. ११५-नुकसान भरपाई अर्ज, नि. १४३ जेल पाठवण्याचा अर्ज, नि. १४६ दावा डिसमिस अर्ज, नि-१४८- दावा फेटाळण्याचा अर्ज नि. ११२- समन्साचा अर्ज, नि. ११३- ५ लाख नुकसान मिळणेचा अर्ज नि. ११४-४२० चा गुन्हा दाखल करणेचा अर्ज, नि. १८६- गुन्हा व १० लाख मिळणेचा अर्ज इ. दाखल करुन अपव्यय करत आहेत. सामुळे अर्ज नामंजूर करुन सदरहू रु. १०,०००/- cost करावी. हे म्हणणे

दि. २४/११/२३

वादी तर्फे ॲड
Adv. B.A. Mhaske

Order

Perused application, say & record. Heard arguments at length. Defendant No. 9 has claimed reliefs which are in the nature of final reliefs. Before adjudication of suit, compensatory costs cannot be awarded as it would amount to assuming the Fate of civil suit. Also before evidence is led any orders of amendment in revenue cannot be given. Also previously this court has directed to furnish ID proof of plaintiff. To ascertain whether allegations are having any substance, it is necessary to direct the plaintiff to furnish ID proof. Hence plaintiff is directed to produce verified copy of ID proof of plaintiff No. 1 on record.

Sd/-
2nd JR CJJD
Rahata
11/02/2025